# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि.२१/८/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१२) इतिवृत्त**

शुक्रवार, दिनांक २१ ऑगष्ट २००९ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ४.३० वाजता** 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस उप आयुक्त(म)श्री. उध्दव घुगे, उप आयुक्त(प्र)श्री. एम.वाय.कांबळे, नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. श्री. गवळी रविकांत काशीनाथ
०३. श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
०४. श्री. सुरे सिताराम इसराम
०५. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०६. श्री. कुचे नारायण तिलोकचंद
०७. श्रीमती मेहरून्नीसा खान हमीद खान
०८. श्री. पांडे विनायक प्रभाकर
०९. श्री. सोनवणे कचरू श्रीपत
१०. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
११. सौ. मोमीन सफिया फिरदौस
१२. श्री. कैसर खान बद्रोद्यीन खान
१३. श्री. शिंदे दामोधर माधवराव

**संवाद :**

मा.सभापती :बैठकीत जे अधिकारी गैरहजर आहेत त्यांचा एक दिवसाचा पगार कपात करण्यात यावी व याबाबतची माहिती स्थायी समितीस देण्यात यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :अधिकारी यांना बरेच काम असतात त्यामुळे पगार कपात करणे उचित नाही. अधिकाऱ्यांना तोंडी सुचना देण्यात यावी.

श्री.प्रशांत देसरडा :महानगरपालिकेकडे 248 दैनिक वेतन कर्मचारी आहेत बऱ्याचशे कर्मचारी दैनिक वेतनावर सेवानिवृत्त होतात. 31 जुन पासून दैनिक वेतन कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्यात आलेली नाही. सदरील दैनिक वेतन कर्मचाऱ्यांना आदेश का देत नाही. सदरील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीचे कुठलेही फायदे नाही, दैनिक वेतनावर कामे करतात, सहावा वेतन आयोग नाही अशा परीस्थितीत कामे करून सुध्दा त्यांचे दोन दोन महिणे मुदतवाढ दिली जात नाही. प्रशासनाने खुलासा करावा.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

सहाय्यक आयुक्त-1 :महानगरपालिकेच्या आस्थापनेवर 87 कर्मचारी दैनिक वेतनावर कार्यरत आहे आणि 161 कर्मचारी चतुर्थश्रेणीवर कार्यरत आहे. या सर्व कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव वेळीच मा.आयुक्तांकडे पाठविण्यात आला होता परंतु दैनिक वेतन कर्मचारी केव्हा पासून कार्यरत आहे आणि सदरील कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी काय कारवाई केलेली आहे. असा शेरा देवून संचिका परत आलेली आहे. सविस्तर माहिती शासनाला दिलेली आहे. मा.सर्वसाधारण सभेने आणि मा.स्थायी समितीने सदरील कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. तसा प्रस्ताव शासनाकडे त्या कर्मचाऱ्यांचे नावासह, जातीचा संवर्ग, वय टाकून शिथीलतेसह मान्यता दयावी म्हणून पाठविलेला आहे तो शासनाकडे प्रलंबीत आहे. सदरील सर्व माहिती मा.आयुक्तांकडे ताबडतोब सादर करण्यात येईल. सदरील कर्मचाऱ्यांना 6 महिने मुदतवाढ देणे बाबत पाठविण्यात येईल.

श्री.विनायक पांडे :ज्यावेळेस 1100 कामगार कायम झाले त्यावेळी स्वच्छता निरीक्षक श्री.टाक बरोबर श्री.दौलत सलामाबाद, दैनिक वेतन कर्मचारी ACB ची केस झाली होती. त्यानंतर तो कोर्टातुन निर्दोष सुटला कोर्टाच्या यादीमध्ये रोजंदारी कर्मचारी म्हणून नाव आहे. गेल्या पाच वर्षापासून सदरील कर्मचाऱ्याला कायम स्वरूपी ऑर्डर देण्यात आलेली नाही.

सहाय्यक आयुक्त-2 :सदरील प्रकरण तपासुन दोन दिवसांत सादर करण्यात येईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :धरणग्रस्त, अनुकंपा, दैनिक वेतनावर लघुटंकलेखक, ड्रायव्हर, जेसीबी ड्रायव्हर कार्यरत आहेत त्यांना कायम करण्याबाबत विचार करण्यात यावा. धरणग्रस्त आणि अनुकंपाच्या पदाबाबत विचार करण्यात यावा. श्री.बोडखे व श्री.नवले, यांचेबरोबरचे कर्मचारी कायम झाले आहे.

सहायक आयुक्त-1 :श्री.बोडखे व श्री.मदगे हे दोन प्रकल्पग्रस्तामध्ये आहे, शासनाची मान्यता आलेली आहे. 27.10.2008च्या समितीमध्ये मान्यता देवून सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये पाठविला होता त्याचा विषय क्रमांक 410 आहे परंतु इतर जे दैनिक वेतनावरील कर्मचारी आहे त्यांनी मा.आयुक्तांना निवेदन देवुन सांगीतले की, सर्व कर्मचाऱ्यांचा एकत्रितरित्या विचार करावा. त्याच्यामुळे आयुक्तांनी सदरील प्रस्ताव तुर्त स्थगीत ठेवावा म्हणून पत्र दिले होते. तेव्हापासून प्रस्ताव स्थगीत ठेवला आहे. त्यांची निवडकरून सर्वसाधारण सभेमध्ये ठेवली होते. श्री.नवले यांचे लघुटंकलेखकाचे जे प्रकरण आहे 248 मध्ये प्रस्ताव पाठविलेला आहे. श्री.नवले यांचा विषय सर्वसाधारण सभेपुढे गेलेला नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :जोपर्यंत 248 जणांची मंजूरी येत नाही तोपर्यंत सदरील कर्मचाऱ्यांना तसेच ठेवणार आहे काय? त्या पिरेडनंतर कुणाला कायम केले नाही काय? शासनाकडुन मंजूरी आल्यानंतरसुध्दा त्यांना कायम केले जात नाही.

सहायक आयुक्त-1 :प्रशासनामार्फत प्रस्ताव ठेवलेला आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :सर्वसाधारण सभेत परत का नाही ठेवण्यात आला. 4 वर्षे झाली.

सहायक आयुक्त-1 :संचिका मा.आयुक्तांकडे ठेवलेली आहे. दैनिक वेतन कर्मचारी तत्कालिन आयुक्त श्री.बंड साहेब यांना भेटुन निवेदन दिले की, सर्व कर्मचाऱ्यांचे एकत्र

करा. तत्कालिन आयुक्तांचे असे मत होते की, जे जे आरक्षणानुसार पद रिक्त आहे त्यानुसार ते भरले जातील.

श्री.प्रशांत देसरडा :डॉ.बडेरा यांना कायम स्वरूपी आदेश देण्यात आले व त्यानंतर आदेश परत घेण्यात आले.

सहायक आयुक्त-1 :मा.सर्वसाधरण सभेपुढे प्रस्ताव ठेवल्यानंतर सर्वसाधारण सभेने त्यांची नियुक्ती रद्द केली.

श्री.प्रशांत देसरडा :मा.आयुक्तांना अधिकारी कनव्हेन्स करू शकले नाही.

सहायक आयुक्त-1 :डॉ.बडेरा यांचा 2006 चा प्रस्ताव आहे. प्रशासनाने प्रस्ताव रद्द केलेला नाही सर्वसाधारण सभेने प्रस्ताव रद्द केलेला आहे.

श्री.प्रशांत देसरडा : आदेश देवून रद्द केले. जिवाशी खेळतो. मा.आयुक्त कन्व्हेन्स होत नाही.

मा.सभापती :डॉ.बडेरा यांचे आदेश कोणत्या कारणामुळे रद्द करण्यात आले.

सहायक आयुक्त-1 :जुलै-2006 मधे पाच कर्मचाऱ्यांची निवड निवड समिती मार्फत करण्यात आली होती. त्यांचा प्रस्ताव मान्यता देवून सर्वसाधारण सभेमधे ठेवण्यात आला होता. मा.सर्वसाधारण सभेने त्यावेळेस असा निर्णय दिला की, दैनिक वेतनावर विहीत मार्गाने जे कर्मचारी नियुक्त झालेले आहे त्यांचा एकत्रित प्रस्ताव ठेवावा.

श्री.प्रशांत देसरडा :प्रशासनाने दोन दिवसआधि पत्र देऊन प्रस्ताव स्थगित ठेवा म्हणुन सांगितले.

सहायक आयुक्त-1 :सदरचा प्रस्ताव वेगळा आहे आणि तो प्रस्ताव वेगळा होता.

मा.सभापती :तत्कालिन आयुक्तांनी मा.महापौरांना पत्र दिले होते काय?

श्री.नारायण कुचे :तत्कालिन आयुक्तांनी पत्र दिले होते.

सहायक आयुक्त-1 :दोन वेगळे विषय आहे.प्रशासनाने आत्ता 2009 ला स्थगीती दिलेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा :दैनिक वेतन कर्मचारी मा.आयुक्तांना भेटले होते.

श्री.रविकांत गवळी :दैनिक वेतनावर काम करीत असलेल्या विहीत मार्गाने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना अद्यापपर्यंत कायमस्वरूपी नियुक्ती दिलेली नाही त्याच अनुषंगाने श्री.दौलत खान,वर्ग-4 कर्मचारी याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

सहायक आयुक्त-2 :श्री.दौलत खान यांना दिनांक 24.11.2008 रोजी नियत सेवामानानुसार सेवानिवृत्त करण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी एक अर्ज दिला होता की, सेवेमधे पुर्णस्थापित करण्यात यावे. शालेय अभिलेखेनुसार मला कामावर घ्यावे त्यांच्या निवेदनावर कळविण्यात आले होते की, आपल्या निवेदनावर विचार करता येणार नाही. त्यानंतर त्यांनी पुन्हा एक अर्ज दिला तो अर्ज प्रस्तावित करून संचिका सादर करण्यात आलेली आहे.

श्री.सतिष कटकटे :तारीख बरोबर आहे काय?

सहायक आयुक्त-2 :फेब्रुवारीत सेवानिवृत्त करायचे होते परंतु ते लेबर कोर्टात गेले होते लेबर कोर्टाने त्यांचे म्हणने नाकारलेले आहे. कोर्टाने काही दिवस स्टे दिला होता स्टे उठल्यानंतर त्यांना सेवानिवृत्त करण्यात आले.

मा.सभापती :सदरचा कर्मचारी 58 वर्षांचा दिसतो तरी का? मॅट्रिकच्या प्रमाणपत्रावर सदरील कर्मचाऱ्याचे वय किती आहे. सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाची प्रत आहे ती आस्थापना विभागाकडे पाठविण्यात आली आहे.

सहायक आयुक्त-2 :जोडलेल्या कागदपत्रानुसार संचिका प्रस्तावित केलेली आहे.

मा.सभापती :सुप्रिम कोर्टाचे निर्देश काय आहे खुलासा करण्यात यावा.

सहायक आयुक्त-2 :सदर संचिका बघून थोडया वेळात खुलासा सादर करण्यात येईल.

मा.सभापती :आठ वर्ष पहिले सेवानिवृत्त करण्यात आले.

श्री.प्रशांत देसरडा :उद्यान मधील कर्मचाऱ्यांचे अरूण नाव होते त्याचे नांव अरूणा करण्यात आले होते. ती बाई आदेश घेण्यासाठी आली होती.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : बदली कामगार आले होते का?

श्री.सतिश कटकटे :प्रभाग ड मधे सन 2005 ला साफसफाई खाजगी तत्वावर करण्यात आली होती. सध्या किती वार्डामधे साफसफाई खाजगी तत्वावर चालू आहे. माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :माहिती देण्यात यावी.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी: वार्ड ब आणि क मधे खाजगी तत्वावर साफसफाई चालू आहे.

श्री.सतिष कटकटे :प्रत्यक्ष भेट देउन पहाणी केली असता साफसफाईचे एकही मजूर जागेवर आढळून आले नाही. वार्ड अधिकाऱ्यांना विचारणा करण्यात आली असता त्यांनांही समाधानकारक उत्तर देता आले नाही. प्रभाग ड मधे किती मजूर कार्यरत आहे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:164 लेबर कार्यरत आहे.

श्री.सतिष कटकटे :दहा वार्डामधे किती लेबर देण्यात आले.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी: दहा वार्डामधे एका ठिकाणी 130 आहे आणि एका ठिकाणी 115 मजूर आहेत. एकुण 245 लेबर आहेत.

श्री.सतिष कटकटे :प्रभाग ड मधील काही वार्डाचे खाजगीकरण रद्द करण्यात आले तर आस्थापनामधून महानगरपालिकेचे किती मजूर त्या ठिकाणी पाठविण्यात आले.

श्रीमती खान मेहरून्निसा :वार्ड क मधे दहा वार्डात साफसफाईकरीता लेबर नाही.

मा.सभापती :वार्ड क मधे काही वार्डाचे खाजगीकरण सुरू आहे काय?

श्री.सतिष कटकटे :खाजगीकरण झाल्यावर आस्थापना विभागाने किती लेबर वार्डात पाठविले.

सहायक आयुक्त-2 :वार्डामधे 288 कर्मचारी असून खाजगी ठेकेदारांची 114 कर्मचारी आहेत असे एकुण 402 कर्मचारी आहेत.

श्री.सतिष कटकटे :16 प्रभागात किती लेबर लागतील.

मा.सभापती :वार्डामधे किती लेबर आहे.

सहायक आयुक्त-2 :वार्ड अ-318, वार्ड ब-328, वार्ड क-263, वार्ड ड-402, वार्ड इ - 297, आणि वार्ड फ-238 कर्मचारी आहेत.

श्री.सतिष कटकटे :वार्ड अ फ येथे 16 प्रभाग आहेत 16 प्रभागामधे 288 लेबर काम करतात तितकेच लेबर वार्ड अ ला आहेत मग खाजगीकरण करण्याची आवश्यकता काय आहे.

श्री.प्रशांत देसरडा :निवडणुक आयोगाच्या रचनेनुसार सर्व वार्ड सारखे केलेत एखादया वार्डाचा एरिया 20 टक्के जास्त असु शकतो, 25 ते 50 कर्मचाऱ्यांचा फरक असू शकतो परंतु एका वार्डात 400 कर्मचारी आणि एका वार्डात 200 कर्मचारी हे बरोबर नाही.

श्रीमती खान मेहरून्निसा :खाजगीकरण रद्द करण्यात यावे,महानगरपालिकेचे करोडो रूपयांचे नुकसान होत आहे.

श्री.सतिष कटकटे :वार्ड अधिकाऱ्यांना साफसफाई करणेसाठी 50 हजार रूपये दिलेले आहे काय? याबाबतीत खुलासा करण्यात यावा. खाजीकरण केलेले आहे तर 50,000/- कशासाठी दिले.

मा.सभापती :मा.आयुक्तांच्या अधिकारात 50 हजार रूपये देण्यात आलेले आहे.

श्री.प्रशांत देसरडा :50 हजार रूपये जे मा.आयुक्तांनी दिलेले आहे ते दर रविवारी साफसफाईसाठी दिले की जे जास्तीचे मटेरीअर वार्डात पडलेले आहे ते उचलण्यासाठी दिलेले आहे.

मा.सभापती :आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:मा.आयुक्तांनी सर्व वार्ड अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना स्वच्छता करण्याचे आदेश दिले परंतु मा.आयुक्तांना पाहिजे तसा प्रतिसाद दिसला नाही. त्यांच्या ऑब्जरव्हेशनमधे ज्या काही कमतरता जाणवल्या त्या सोडविण्यासाठी पुर्वीचे जे कचऱ्यांचे लोड आहे ते उचलण्यासाठी म्हणून 50 हजार रूपये वार्ड अधिकाऱ्यांना देण्यात आले. त्यांना पाहिजे असेल तर गाडया, खाजगी तत्वावर मजूर जी काही साधनसामुग्री आणि मनुष्यबळ लागेल ते त्यांनी हयामधून घ्यावे. तीन दिवसांमधे 50 हजार खर्च करून पुर्ण जुणा कचरा उचलला जावा हा उद्देश होता. प्रत्येकाने समायोजन केले.

श्री.सतिष कटकटे :निधी खर्च करण्यात आला काय?

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:ज्या अधिकाऱ्यांना जसे जमले तसे त्यांनी समायोजन केले आणि काही अधिकाऱ्यांनी पैसे परत केलेत.

श्रीमती खान मेहरून्निसा :कुठल्या प्रभागात पैसा खर्च केला आणि कुठल्या प्रभागात खर्च केला नाही याबाबतची यादी/माहिती देण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे :कुठल्या प्रभागाच्या अधिकाऱ्यांनी पैसे परत केले खुलासा करण्यात यावा.

आरोग्य वैद्य.अधिकारी :सध्या माहिती उपलब्ध नाही माहिती घेऊन सांगण्यात येईल.

श्री.सिताराम सुरे :माझ्या वार्डात साफसफाई व्यवस्थितरीत्या होत नाही.

मा.सभापती :प्रशासनाने पुर्ण माहिती मागविण्यात यावी त्यानंतर सभागृहात माहिती देण्यात यावी.

श्री.सतिष कटकटे :10 वार्डात महिण्याला किती खर्च येतो याची माहिती देण्यात यावी.

श्री.नारायण कुचे :प्रशासनाने खुलासा केला की, वार्ड इ मधे 297 लेबर आहेत. कमीत कमी माझ्या वार्डात 8x16=128 लेबर आहेत. इतर लेबर कुठे आहे खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :प्रशासन माहिती मागवित आहे.

श्री.प्रशांत देसरडा :सिडको येथे खाजगी ठेकेदार दैनिक कर्मचाऱ्याप्रमाणे पगार परवडत नव्हते. बोगस लेबरची संख्या टाकून ठेवलेली आहे. माझ्या वार्डात कंत्राटदार गेला

बचत गट आले परंतु कर्मचारी जुणेच आहे. माझ्या वार्डात 3 कर्मचारी सापडत नाही कारण कंत्राटदाराने बोगस नावे टाकुन ठेवलेली होती. हिच स्थिती सर्वच वार्डात आहे व संबधीत ठेकेदार त्यांच्या नावाचा पगार उचलत होते. मा.आयुक्त विभाग प्रमुखांना नेमतात. त्यांनी वार्डाची हद्द दाखवावी. कर्मचारी असे आहेत की, वॉर्ड अधिकारी काही करू शकत नाही. एक दिवस गैरहजेरी लावली तर दुसऱ्या दिवशी अॅट्रॉतसटी.

श्री.सतिष कटकटे :दहा वार्डाची साफसफाई आहे काय?

श्री.प्रशांत देसरडा :अधिकाऱ्यांचीही बाजू बघीतली पाहिजे अधिकाऱ्यांवर हे कर्मचारी दबाव आणत असतात. एकीकडे महिला बचत गट सक्षम व्हावे असे म्हणतो परंतु दुसरीकडे जुणे कंत्राटदाराकडील लेबर घेतले पाहिजे हि एक प्रकारची मोनोपॉलि आहे.

मा.सभापती :प्रभाग ड ला किती वार्डाचे खाजगीकरण आहे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:10 वार्डाचे खाजगीकरण आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :हा जो साफसफाईचा कर्मचाऱ्यांचा घोळ आहे तर मा. आयुक्त साहेबांना विनंती आहे की, सर्वांना एक दिवसांचा पगार देवून एका ठिकाणी जमा करावे व व्हिडिओ शुटिंगद्वारे सर्वाचे चित्रीकरण करून घेण्यात यावे म्हणजे प्रत्येक वार्डामधे मजूर किती हजर राहतात हे पहाता येईल त्या सर्वांना ओळखपत्र देण्यात यावे. स.सदस्यांच्या समोर सर्वांची ओळख परेड घेण्यात यावी.

मा.सभापती :एक दिवस ओळखपरेड ठेवण्यात यावी.

श्रीमती खान मेहरून्निसा:खाजगीकरण बंद करण्यात यावे व महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडुन साफसफाईचे कामे करून घेण्यात यावी.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : आबेटची एक बॉटल असते. फक्त 2 थेंब टाकतात.

श्री.सतिष कटकटे :पाच वार्डाचे खाजगीकरण करण्यात आलेले आहे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : फॉगींग मशीनने फवारणी होत नाही. डास, मच्छर वाढले आहेत.

मा.सभापती :श्री.दौलत खान यांचे जन्मतारखेबाबत खुलासा करण्यात यावा.

सहायक आयुक्त-1 :संबधीताच्या सेवापटामधे 07.02.1948 हया जन्मतारखेची नोंद केलेली आहे. सेवानिवृत्तीची नोटीस दिल्यानंतर त्यांनी 06.03.1954 अशी दिलेली आहे.

मा.सभापती :सेवापुस्तकामधे कशाच्या आधारे जन्मतारखेची नोंद आहे.

सहायक आयुक्त-1 :सिव्हील सर्जन यांनी दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे जन्मतारखेची नोंद आहे.

मा.सभापती :त्यांनी दिलेल्या तारखेमधे सेवापटाच्या तारखेमधे किती वर्षाचा फरक आहे.

सहायक आयुक्त-1 :सहा वर्षांचा.

मा.सभापती :06.03.1954 हि कशाच्या आधारावर जन्मतारीख आहे.

सहायक आयुक्त-1 :शालेय अभिलेख्यानुसार 06.03.1954 तारीख आहे.

मा.सभापती :श्री.दौलत खान यांच्याबाबतीत सुप्रीम कोर्टाचे आदेश आणि जन्मतारखेचे कागदपत्र विधी सल्लागार यांचेकडुन तपासणी करून घेण्यात यावी व त्यानुसार निर्णय घेण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी :सन 2001 मध्ये रिवाईज डिपी प्लॅन मंजूर झाला त्यामध्ये बरेचश्या भुखंडांचे आरक्षण टाकण्यात आलेले आहे. उदा.गार्डन,शाळा,ओपनस्पेस किंवा डिपी रोड, आरक्षीत केलेले जमीन मालकांनी महानगरपालिकेकडे वारंवार मोबदला संदर्भात मागणी विनंती केलेली आहे. महानगरपालिकेकडे पैसा नसल्याकारणाने रोख मोबदला महागनरपालिका देवू शकत नाही. त्याकारणाने जमीन मालक वीस बाय तीसचे प्लॉटिंग करून विकत आहे. 2001 मध्ये डिपी प्लॅन मंजूर झालेला आहे त्याची अंमलबजावणी होणे शक्य नाही. ज्या जमीनीमधून डिपी रस्ता बाधीत होतो जमीन मालकांनी आपल्याकडे रेखांकन मंजूर करण्यासाठी संचिका दाखल केल्या त्या मंजूर करावे. बाधीत जागांचा मोबदला मागून थकले. 20X30 करून विक्री झाले. सदरील व्यक्तिंना आज रोजी मोबदला देवू शकत नाही. भावसिंगपूरा गट नंबर 26 मध्ये 45 मिटर रस्ता बाधीत होतो त्या लोकांनी सन 2004 ला रेखांकन मंजूरीसाठी महानगरपालिकेकडे दाखल केले आहे. रेखांकन मंजूर झालेले आहे त्यासंदर्भात विकास खर्चासंदर्भात माझ्या जमीनीमधून जो रस्ता बाधीत होतो त्याचा मोबदला न देता विकास खर्च म्हणून माझ्याकडुन रेखांकनासंदर्भात भरून घेण्यात यावा अशी मागणी केलेली आहे व उर्वरीत मोबदला देण्यात यावा त्याकरीता त्यांचा रेखांकन मंजूर करून उर्वरीत मोबदला देण्यात यावा.

मा.सभापती :सदरील संचिक्ेची पहाणी केलेली आहे मा.आयुक्तांबरोबर चर्चा झालेली आहे. दिनांक 25.12.2008 रोजी तत्कालिन आयुक्त श्री.बंड साहेब यांनी मान्यता दिली होती. प्रशासनाने खुलासा करावा की, सदरील प्रपोजल दाखल केव्हा झाले तत्कालिन आयुक्तांनी मान्यता केव्हा दिली त्यानंतर तत्कालिन आयुक्त श्री.वैद्य यांचेकडे संचिका कशासाठी गेली खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता (श्री.खन्ना) : दमयंती एस.सोनवणे व इतर यांनी भावसिंगपूरा भागातील सर्वे नंबर 26 मधील जमीनीसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. प्रस्ताव सन 2002 ला सादर केलेला आहे.

मा.सभापती :सात वर्षापासून ले आउटला मंजूरी नाही.

उपअभियंता (श्री.खन्ना) :ले आउटला मंजूरी दिलेली आहे, त्यांना बेटरमेंट चार्जेस,लॅन्ड डेव्हलपमेंट चार्जेस, डिमार्केट प्लॅनची पुर्तता करण्यासाठी कळविण्यात आलेले होते. त्यानंतर त्यांनी बेटरमेंट चार्जेसची रक्कम अद्याप भरलेली नाही. त्यांचे म्हणने आहे की, रस्त्याचा जो मोबदला आहे], बाधीत क्षेत्र आहे त्याच्यातुन वळती करावी अशी त्यांची मागणी आहे.

श्री.प्रशांत देसरडा :उधारीत ले आउट मंजूर केलेले आहे काय?

उपअभियंता (श्री.खन्ना) :ले आउटला फायनल ॲप्रुव्हल झालेला नाही. तत्वतः मान्यता झालेली आहे

श्री.प्रशांत देसरडा :तत्वतः मान्यता केव्हा असते, पुर्ण पैसे भरल्याशिवाय मान्यता होते काय?

उपअभियंता (श्री.खन्ना) :अटींच्या अधीन राहून पैसे भरून घेतो. बेटरमेंट चार्जेस,लॅन्ड डेव्हलपमेंट चार्जेस, डिमार्केट प्लॅन, ओपन स्पेस हस्तांतरीत करणे या अटींवरती मान्यता कळविण्यात येते. या सर्वांची पुर्तता केल्यावर मान्यता दिली जाते. सदरील प्रकरणामध्ये विकास खर्च विकास शुल्काची रक्कम जमा केलेली नाही.

श्री.रविकांत गवळी :आज रोजी नगदी मोबदला देवू शकत नाही. जो विकास खर्च आहे तो जमा करून घेण्यास सांगीतलेला आहे त्यांची मागणी चुकीची आहे काय?

उपअभियंता (श्री.खन्ना) :मागणी योग्य आहे पण मोबदल्यापेक्षा जास्तीची जी रक्कम आहे त्याचा विषय आहे.

श्री.रविकांत गवळी :चर्चा अशी आहे की,1984 पासून रस्ता हस्तांतरीत करून घेतलेला आहे तर त्यावेळेसचा दर दयायचा कि आजचा दर दयायचा. सन 1984 पासून रेडी रकनर प्रमाणे आजचा दर देवू परंतू मग 1984 पासून ते आज पर्यंत व्याज देणार आहे काय त्यांना. कि आजचा दर देणार.

मा.सभापती :सन 2004मधे सदरील व्यक्तिंची जागा ताब्यात घेतली आहे काय?

उपअभियंता (श्री.खन्ना) :डिसेंबर 2004 साली रेलीन क्वीशमेंट ॲण्ड डिड ने जागा हस्तांतरीत करून दिलेली आहे.

मा.सभापती :रजिष्टरर्ड रेलीन क्वीशमेंट डिडने सन 2004 साली जागा ताब्यात घेतली आहे परंतु अद्याप ले आउटला मान्यता दिलेली नाही.

उपअभियंता (श्री.खन्ना) :बेटरमेंटचा चार्जेसचा जो मुद्दा होता किंवा मोबदल्याच्या रकमेतून वळती करून घेणे त्यासाठी प्रकरण प्रलंबीत आहे.

मा.सभापती :पीआर कार्डवर नोंद झालेली आहे काय?

उपअभियंता (श्री.खन्ना) :अद्याप फायनल मंजूरी झालेली नाही.नामांतराची कारवाई झालेली नाही.

श्री.रविकांत गवळी :दोघांच्या मान्यतेनुसार सन 2004 ला हस्तांतरीत करून घेतले मग आज रोजी पीआर कार्डवर नोंद असणे गरजेचे आहे.

उपअभियंता (श्री.खन्ना):बेटरमेंट चार्जेसची रक्कम अद्याप भरलेली नाही.

श्री.रविकांत गवळी :डिपी रस्ता आहे तो महानगरपालिकेला हस्तांतरीत केलेला आहे. मोबदल्या संदर्भात रेखांकन मंजूर करून घेतले त्याचा मोबदला वळती करण्यास सांगीतला परंतू ज्या रोजी हस्तांतरीत झालेली प्रॉपटी आहे त्यावर पीआर कार्डवर नोंद घेणे गरजेचे आहे.

उपअभियंता (श्री.खन्ना) :अटींबाबत संबधीतांना कळविण्यात आलेले आहे.

श्री.रविकांत गवळी :10 वर्ष नाव लावणार नाही व रेखांकन मंजूर होणार नाही व वीस बाय तीस करून जागा विकून टाकतील.

उपअभियंता (श्री.खन्ना):मुद्दा फक्त बेटरमेंट चार्जेस वळती करून घेण्याचा आहे.

श्री.रविकांत गवळी :शहरात करोडो रूपयांची जागा असतांना फक्त आरक्षीत असल्यामुळे विकता येत नाही.सरकारी दरानुसारसुध्दा आज रोजी मोबदला देवू शकत नाही. जमीन मालकांची त्यामुळे द्विधा मन:स्थिती झालेली आहे विना आरक्षीत जागा दुप्पट दराने विक्री करत आहे.

मा.सभापती :नियमानुसार किती मोबदला दयायचा आहे.

उपअभियंता (श्री.खन्ना):ले आउटसाठी बेटरमेंट चार्जेस 4 लाख 12 हजार रूपये, जमीन विकास शुल्क 58 हजार रूपये आणि अशी जी रक्कम वळती करून त्यांना 14 लाख 58 हजार रूपये देणे आहे.

मा.सभापती :खड्डयासंर्भात काय आहे.

उपअभियंता (श्री.खन्ना) :खड्डयांचे 8 लाख 35 हजार रूपये आहेत डिपी रोडचा भाग असल्याकारणाने डिपी रोडच्या कंस्ट्रक्शनमधे त्याचा समावेश असल्यामुळे ते वजा केलेले आहे.

मा.सभापती :14 लाख मध्ये ॲड होणार आहे काय?

उपअभियंता (श्री.खन्ना) :14 लाख त्याच्यासह आहे.

मा.सभापती :एकुण मोबदला 28 लाख रूपये होतात. तत्कालिन आयुक्त श्री.बंड साहेब यांनी मान्यता दिली होती तेव्हा 28 लाख रूपये होते.

श्री.खन्ना :मान्यता झालेली होती त्यातुन त्यांचे लॅन्ड डेव्हलपमेंट चार्जेस,बेटरमेंट चार्जेस वजा करता 14 लाखाची रक्कम देय होते.

मा.सभापती :14 लाख 58 हजार बाकी राहतात आणि सन 2004 पासून महानगरपालिकेने जागा ताब्यात घेतलेली आहे. खड्डयाचे पैसे कापण्यासाठी चार वर्ष संचिका रखडली. अशा किती ले आउटला अट टाकली होती. सन 1996 ते 2009 या 13 वर्षांत 207 ले आउट मंजूर केलेले आहे. गड्डयाचे पैसे कापण्यासाठी कुणी निर्णय घेतला.

श्री.कचरू सोनवणे :सन 1996 ते 2009 मध्ये तीन हजार संचिका दाखल झाल्या गट नंबर 26 ची लेआउटची संचिका सन 2002 मध्ये दाखल झाली परंतु माझा या ठिकाणी असा आरोप आहे की, सदर संचिका ज्यांनी दाखल केली ते वयोवृध्द व्यक्ति आहेत व मागासवर्गीय व गरीब आहे म्हणून त्यांच्यावर सदरील अन्याय होत आहे. त्यामुळे तातडीने सदरील विषयावर निर्णय घेण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा :गेल्या 15 दिवसांपूर्वी टाउन प्लॅनिंग विभागाला भेट दिली असता तेथील आवक जावक रजिष्टर जमा केले आणि त्यात किती तरी ले आउट पेंडीग असल्याचे आढळून आले. आजचे गट नंबर 26 मधील उदाहरण बघीतल्यावर आढळून येते की, शुल्लक कारणावरून ले आउट पेंडीग आहेत. ते मंजूर न केल्यामुळे करोडो रूपयांचे नुकसान झालेले आहे. जे ले आउट मंजूर केले नाही त्यांनी वीस बाय तीसचे प्लॉटिंग केले. सर्वसाधारण सभेमध्ये भुसंपादनाचे किती प्रस्ताव येतात आणि वास्तवात किती प्रस्ताव दाखल होतात याबाबतीत संशोधन केलेतर लक्षात येईल की, ठरावीक व्यक्तिंचे त्यांचेच प्रस्ताव भुसंपादनासाठी येतात आणि नॉमिनल जे प्रोसेस करतात अशांचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर येत नाही त्यामुळे मा.आयुक्तांनी अशे किती प्रस्ताव प्रलंबीत आहे जसे भांवसिंगपुरा येथील ले आउट प्रलंबीत आहे शुल्लक ज्या त्रुटी आहे त्या कारणाने त्याची एकुण संख्या किती आहे त्याचा अहवाल स्थायी समितीकडे आला पाहिजे.

मा.सभापती :गट नंबर 26 मध्ये विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्रासाठी सन 2004 मध्ये जागा ताब्यात घेण्यात आलेली आहे. सन 2002 पासून सदरील प्रकरण नगर रचना विभागात अनेक कारणांनी प्रलंबीत आहे. सदरील ले आउट त्वरीत मंजूर करण्यात यावे आणि गड्डयाचे आठ लाख रूपये वजा करून 21 लाख रूपयांपर्यंत मोबदला देण्याची कारवाई त्वरीत करण्यात यावी आणि केलेली कारवाईचा अहवाल स्थायी समितीकडे सादर करावा.

श्री.विनायक पांडे :सन 1975 पासून बेगमपुरा येथे एक रिझंवेशन आहे त्याजागेच्या मोबदल्या संदर्भात महानगरपालिका प्रशासनाने 45 लाख रूपये भरावे असा आदेश मार्च महिण्यामधे आलेला आहे. सदरील व्यक्ति श्री.कस्तुरे अत्यंत गरीब परिस्थितीतील आहे सन 1975 पासून महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार करीत आहे. सदरील संचिका आपण व श्री.खन्ना यांनीसुध्दा पहाणी केलेली आहे. 45 लाख रूपये प्रशासनाने जमा केलेत का?

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

सहा.संचालक न.र. :सदरील संचिकेची पहाणी केलेली आहे भुसंपादन अधिकाऱ्यांनी 45 लाख रूपये 2/3 रक्कम भरण्यासाठी पत्र दिलेले आहे. आठ दिवसांपुर्वीच मा.आयुक्तांकडे 45 लाख रूपयांच्या मंजूरीसाठी संचिका पाठविण्यात आली आहे.

मा.सभापती :प्रशासनाने मा.आयुक्तांची मंजूरी घेवून पैसे पाठविण्यात यावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :माजी आमदार यांचे घरासमोर एक नविन रोड तयार केला परंतु आजूबाजुचे सर्व ड्रेनेज चोकअप झालेले असल्यामुळे रस्त्यावर घाण पाणी येत आहे.

मा.सभापती :स.सदस्यांनी दिलेल्या सूचनांचे त्वरीत कार्यवाई करण्यात यावी.

श्रीमती सफिया मोमीन : वार्ड नंबर 96 येथील पुलाच्या आजुबाजूच्या रस्त्यांची दुर्दशा झालेली आहे मोठमोठे खड्डे पडलेले आहे. त्याठिकाणी अपघाताची संख्या वाढलेली आहे. भेट द्यावी.

मा.सभापती : प्रशासनाने त्वरीत कारवाई करावी. मा.आयुक्त साहेब नाहीत. त्यांना घेऊन जावू.

श्रीमती सफिया मोमीन :वार्ड फ चे जे वार्ड कार्यालय आहे मालखरे इमारतीत त्या ठिकाणी लाखो रूपये भाडे देत आहे तर प्रशासनाने महापालिकेच्या रिक्त इमारतींमधे वार्ड फ कार्यालय शिफ्ट करण्यात यावे.

श्री.प्रशांत देसरडा :वॉर्ड फ मध्ये ज्या तिन दुकाना रिक्त होत्या त्या वार्ड कार्यालयास मिळण्यासाठी मागील सभेत आलेले टेंडर रद्द करण्यात आले.

मा.सभापती :स.सदस्यांच्या प्रश्न आहे की, मालखरेच्या इमारतीमुळे महानगरपालिकेचे लाखो रूपयांचे नुकसान होत आहे.

श्री.प्रशांत देसरडा :वार्ड फ कार्यालय भाडयाचे आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे आहे खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त(सिडको) :स.सदस्यांनी जो विषय काढला आहे त्यासंदर्भात सध्या माझ्याकडे माहिती नाही. माहिती घेवुन माहिती सादर करण्यात येईल.

मा.सभापती :प्रशासनाने सोमवार पर्यंत माहिती सादर करण्यात यावी.

श्रीमती खान मेहरून्निसा:नाले सफाईसाठी 50 हजार रूपये देण्यात आले होते. एकही नाला साफ करण्यात आलेला नाही. सहा प्रभागात तीन लाख रूपये देण्यात आले परंतु साफसफाईचे कामे झालेली नाही.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) : नाला सफाईसाठी वार्ड इंजिनिअर यांना 50 हजार रूपये दिले होते. 50 हजारामधे वार्ड क चे सर्व नाले साफ करायचे होते परंतु सर्व नाले साफ करणे शक्य नव्हते परंतु वार्ड इंजिनिअर यांनी लेबर लावून नाल्याची सफाई केलेली

आहे. नाला सफाईपुर्वीचे आणि नंतरचे फोटोग्राफ्स काढुन घेतलेले आहे. 50 हजार रूपयांमधे जेवढे काम करता आले ते त्यांनी केलेले आहे.

श्रीमती खान मेहरून्निसा :मा.सभापती यांनी नाल्यांची पहाणी करावी.

श्री.सतिष कटकटे :कार्योत्तर मंजूरी देवून 30 लाख रूपये नाला सफाईसाठी दिले त्या पैशांचे काय केले.

मा.सभापती :नाला सफाईबाबत प्रशासनाने खुलासा करावा. वार्ड अ,ब,क या कार्यकारी अभियंत्यांनी खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता वार्ड अ,ड: वार्ड अ व ड या प्रभागात असलेल्या नाल्याची सफाई झाली आहे त्यासाठी दोन निवीदा काढण्यात आल्या होत्या. वार्ड अ मधे एकुण सहा नाले होते ते यंत्राच्या व लेबरच्या सहाय्याने गाळ काढलेला आहे व नाला सफाई केलेली आहे. वार्ड ड मधेही यंत्राच्या व लेबरच्या साहयाने नाल्यांची सफाई केली. कुठेंही अडसर निर्माण होत नाही. नालासफाई करून जवळपास महिना झाला आहे आज पुन्हा प्रत्यक्ष स्थळी जावून पहाणी करण्यात येईल.

मा.सभापती :खर्चाबाबत स.सदस्यांनी विचारणा केलेली आहे.

कार्य.अभि.(वार्ड अ ड) :पेमेंट अजूनपर्यंत करण्यात आलेले नाही. पावसाळा संपेपर्यंत त्यांना काम करायचे आहे. त्यानंतर पेमेंट करणार आहे.

मा.सभापती :वर्क ऑर्डर न होता काम सुरू झालेले आहे.

कार्य.अभि.(वार्ड अ ड) :वर्क ऑर्डर झालेले आहे.

श्री.सतिष कटकटे :स्थायी समितीने नाला सफाईसाठी कार्योत्तर मंजूरी किती लाखांची दिली होती.

कार्य.अभि.(वार्ड ब क) : वार्ड ब आणि क साठी 5 लाखांची निवीदा काढली होती, सध्या वार्ड ब मधे काम चालू आहे. वार्ड ब चे काम संपल्यानंतर वार्ड क मधे काम करण्यात येईल.

कार्य.अभि.(वार्ड इ फ) : वार्ड इ आणि फ करीता निवीदा कोणतीच काढण्यात आलेली नाही. लेबररेट आणि जेसीबीच्या सहाय्याने काम सुरू आहे.

श्री.सतिष कटकटे :प्रभाग ड मधे .0 लाख खर्च केले आहे. कार्योत्तर मान्यता घेतलेली आहे.

मा.सभापती :कुणालाही एक रूपया पेमेंट करण्यात आलेले नाही.

श्री.सतिष कटकटे :खाजगी लेबर लावून काम केले का महानगरपालिकेचे लेबर लावून काम केले. पाच लाख रूपये जमा आहे किंवा नाही याबाबतीत माहिती देण्यात यावी.

कार्य.अभि.(वार्ड इ फ) :डेलि वेजसवर लेबर लावण्यात आले होते त्यांचे पेमेंट केले आहे. जेसीबी आणि ट्रकच्या माध्यमातून माल उचलण्यात आला आहे. साधारणतः तीन लाख रूपये खर्च आला असेल.

श्री.रविकांत गवळी :प्रत्येक वार्डामधे रकमेची तफावत कशामुळे.

श्री.सतिष कटकटे :तीस लाख रूपये कार्यात्तर मंजूरी दिलेली आहे तीस लाख रूपयाचे वर्गीकरण वार्ड वाईज कशापध्दतीने केले आहे याबाबतीत विचारणा केली होती अद्यापपर्यंत उत्तर देण्यात आले नाही.

मा.सभापती :शहर अभियंता यांनी खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता :जी माहिती देण्याची प्रलंबीत आहे ती माहिती देण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी :माझ्या वार्डातील खाम नदीचा नाला झाला आहे. खाम नदीची साफसफाई केली आहे काय?

मा.सभापती :खाम नदीबाबत खुलासा करण्यात यावा.

अति.शहर अभियंता :नदीसाठी तरतुद केलेली नाही.

श्री.रविकांत गवळी :20 लाखाची तरतुद ठेवलेली आहे, हर्सुल ते बेगमपुरा येथील लोकांनी सांडपाणी नदीच्या पात्रात सोडलेले आहे ती नदी आता नदीचे नाल्यात रूपांतर झालेले आहे.

कार्य. अभियंता :संपूर्ण खामनदीची साफसफाई करण्यासाठी करोडो रूपये लागतील.

श्री.रविकांत गवळी :ड्रेनेज लाईन,चोकअप त्याठिकाणी काढलेले आहे.

कार्य. अभियंता :आरेफ कॉलनीच्या तेवढया परिसराची स्वच्छता केलेली आहे.

श्री.रविकांत गवळी :हर्सुल, जहांगीर कॉलनी, एकता नगर,एन-13 या ठिकाणीही वस्ती झालेली आहे. त्या ठिकाणी काम करणे गरजेचे आहे.

कार्यकारी अभियंता :निधी उपलब्ध झाल्यास काम सुरू करता येईल.

श्री.रविकांत गवळी :इतर नाल्याप्रमाणे खामनदीचा समावेश नाही काय?

कार्यकारी अभियंता :नाही.

श्री.रविकांत गवळी :त्या ठिकाणची परिस्थिती गंभीर स्वरूपाची झालेली आहे काम करणे गरजेचे आहे.

कार्य.अभियंता :अर्थसंकल्पाला जो पर्यंत मंजूरी मिळत नाही तोपर्यंत काम होणार नाही.

श्री.रविकांत गवळी :आज रेटलिस्ट व एवन सर्रासपणे चालू आहे त्यास तरतुदीची गरज नाही काय? तात्काळ कामे करण्यासाठी तरतुद नाही इतर कामे करण्यासाठी तरतुद आहे.

लेआउटचे एकुण किती संचिका प्रलंबीत आहे खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा की, 1996 पासून किती ले आउट च्या संचिका प्रलंबीत आहे.

सहा.संचालक न.र :आजच्या स्थितीला माहिती उपलब्ध नाही.

श्री.रविकांत गवळी :ज्या संचिका टाउन प्लॅनिंग विभागातुन हस्तगत केल्या त्यात अंतिम मंजुरीसाठी 2306 संचिका दाखल झालेल्या आहे त्यापैकी 207ला अंतिम मंजूरी दिलेली आहे. 2100 संचिका प्रलंबीत आहे त्याकारणाने महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडलेली नाही. जे ले आउट मंजूरीसाठी कित्येक वर्षापासून प्रलंबीत आहे ते आजच्या स्थितीत बांधकाम झालेले आहे याची शहानिशा होणे गरजेचे आहे.

मा.सभापती :जे ले आउट अंतिम झालेले नाही त्या ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे. खुलासा करण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी :पुर्ण कागदपत्रांची पुर्तता झाल्याशिवाय संचिका सादर करून घेत नाही. सदरील संचिका प्रलंबीत ठेवण्यासाठी कुठल्या त्रुटी आढळल्या खुलासा करण्यात यावा.

सहा.संचालक न.र :अपुर्ण संचिका दाखल करून घेत नाही, सन 1996 सालच्या संचिकेची पडताळणी केल्याशिवाय सांगता येणार नाही. प्रत्येक संचिकेची पहाणी करून तपासणी करावी लागेल.

श्री.रविकांत गवळी :अशा कुठल्या त्रुटी राहतात की ज्यामुळे बांधकाम परवानगी मिळत नाही.

सहा.संचालक न.र :रेखांकन आणि बांधकाम परवानगी या दोन वेगवेगळया गोष्टी आहेत. रेखांकनाला सुरवातीला तत्वतः मान्यता देण्यात येते त्यानंतर एलडीसी भरणे व इतर बाबी पुर्ण कराव्या लागतात. त्यानंतर अंतिम मान्यता देण्यात येते.

श्री.रविकांत गवळी :रेखांकनाला मंजूरी दिली नाही परंतु बांधकाम झालेले आहे.

सहा.संचालक न.र :संचिका बघुन तपासुन निर्णय घ्यावा लागेल.

मा.सभापती :पावसाचे पाणी दाखल झाल्याअसल्यामुळे मा.शहर अभियंता, कार्यकारी अभियंता यांनी तात्काळ स.सदस्य श्री.कोकाटे यांच्यासोबत प्रत्यक्षस्थळावर जावे. आणीबाणीची परिस्थिती निर्माण झालेली आहे.

लेआउटच्या बाबतीत संपुर्ण माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी.

श्रीमती सफिया मोमीन:माझ्या वार्डातील 24 मीटरच्या रस्त्याचे काम झाले आहे. जीआय पोलचे केबल वायर तुटलेले आहे.

मा.सभापती :आजची सभा स्थगीत करण्यात येते. सभा दिनांक 24.08.2009 रोजी दुपारी 4.00 वाजता सभा घेण्यात येईल.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद